(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कौटुंबिक जीवन

**प्रा. बनसोडे सुवर्णा सुशिला महादेव** ( सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग )इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे विश्वासराव रणसिंग महाविद्यालय कळंब वालचंदनगर ता.इंदापूर जिल्हा पुणे.

---

**प्रस्तावना**

मुरबाडकर,आंबावडेकर
कुटुंबाची बातच होती न्यारी
मालोजी, धर्माजीनं…
इंग्रजी सैन्यात गाजवली कामगिरी!!
सैनिक शाळेत, मुख्याध्यापक,सुभेदार म्हणून रामजींची वर्णी!!
सुसंस्कारी रामजींनी
अभंगवाणी , कबीरवाणी ची लावली गोडी!!.
अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजाचं जगणं म्हणजे रोज मारणंच होतं

शतकानुशतके वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, चातुर्वर्ण्याच्या जोखडात हा समाज बंदिस्त होता. इंग्रजी सत्तेमुळे भारतात शिक्षण सुरू झाले!! मालोजी,धर्माजी, रामजी , बाळाराम,तुळसा, मंजुळा, आनंदराव भीमराव हे सर्व शिक्षण घेऊ शकले.

भारतीय समाज व्यवस्थेत शिक्षणाचा अधिकार सोडाच निसर्ग निर्मित पाणी पिण्याचा अधिकारही नव्हता! मात्र पशू पक्षी पाणी पित हेते अस्पृश्यांच्या सावलीचा विटाळ होत होता. गुलामीचं जीवन जगणाऱ्या या समाजाला नवचैतन्य मिळवून देण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले आयुष्य पणाला लावले. शाळेच्या बाहेर बसून शिक्षण घेतले आणि जगाच्या विद्यापीठात सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून आजही चमकत आहेत.

केवढी ती जिद्द, चिकाटी , आणि जगाला लाजवेल असं पांडित्य! आनंदराव, लक्ष्मीबाई , बाळाराम,गौरा, शंकर यांनी हातभार लावलाच पण आई भीमाबाईचा मृत्यू झाला अन् भीवा आई प्रेमाला पारखा झाला तेंव्हा मायेची ऊब देण्याचं काम मीरा आत्या यांनी भीवा ची आई बनून केलं!!

रामाजीने वाचनाची गोडी लावली.
दागिने गहाण ठेवून पुस्तके आणून दिली
रात रात जागून अभ्यास करून घेतला हे जगातील एकमेव आश्चर्य मानले पाहिजे ?
तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना कृष्णाजी केळुस्कर सारखे शिक्षक मिळाले
परदेशात प्राध्यापक चांगले मिळाले, आणि त्यांच्या शिक्षणासाठी बडोदा संस्थानचे अधिपती महाराजा सयाजीराव गायकवाड

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी शिष्यवृत्ती दिल्या म्हणून बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य समाजाला , भारतीय महिलांना न्याय देऊ शकले अनेक चळवळी मार्फत जनजागृती केली अनेक वृत्तपत्रे काढून समाजला जागृत केलं आणि परिवर्तनाची सुपीक भूमी तयार केली हे सर्व करण्यासाठी माता रमाई सावलीसारखी डॉक्टर बाबासाहेबांच्या पाठिशी उभी राहिली

रमाबाई यांनी आपल्या चार मुलांचा मृत्यू पचविला काय वाटलं असेल त्या आईला??? काय वाटले असेल त्या पित्याला हे आभाळाएवढ दुःख बाजूला ठेवून समाज सुधारण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब यांना अनुमती दिली धन्य धन्य ती माता रमाई

परदेशी शिक्षण घेऊन बॅरिस्टर होऊन बाबासाहेब आले तरीही रमाईने हट्ट केला नाही ती बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नासाठी झिजली, संसार, कुटुंबासाठी अहोरात्र मेहनत केली उपाशी पोटी पाणी पिऊन दिवस काढले पण डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणाच्या आड माता रमाई आली नाही हिमालयासारखी अभेद्य राहून रमाईने कुटुंब सांभाळले.

बाबासाहेब आंबेडकरांनी रमाईला लिहिण्यास , वाचण्यास शिकवले महात्मा फुले सावित्रीबाई फुले यांच्या आदर्शांचा हा परिणाम…म्हणून रमाई परदेशी डॉ बाबासाहेबाना सुख दुःखाची पत्र पाठवून इकडे सर्व ठीक आहे तुंम्ही मन लावून अभ्यास करा आपल्या समाजासाठी, तुंम्ही जगातील ज्ञान मिळवा असं रमाई सांगत असत डॉक्टर बाबासाहेब देखील पत्रांना उत्तर देत असत. त्यांना आपल्या कुटुंबाची काळजी होती.

शतकानुशतकाच्या वर्णव्यवस्थेला मूठमाती देण्यासाठी आणि गुलामाला गुलामीची जाणीव करून देण्यासाठी खाण्यासाठी वेळ नव्हता मौल्यवान वेळेवर झडप घालून पदव्या मागून पदव्या घेऊन उच्च वर्णियांना चपराक दिली. डॉक्टर बाबासाहेब यांनी हे सर्व मिळवताना अपमानाच्या किती राशी पचविल्या???

त्याची बेरीज वजाबाकी कोणी केली आहे का??

भीमाई आणि रामजी विवाह

14 एप्रिल 1891साली मध्यप्रदेशी
महू गावी

भीमाईंच्या पोटी चौदावं रत्न जन्मले
भीमाईंच्या पोटी विश्वरत्न जन्मले
भीमाईंच्या पोटी महिलांचा मुक्तीदाता जन्माला
शतकानुशतकांचा अंधार भेदण्या
भीम जन्माला
गं बाई भीम जन्माला
दिन दुबळयांचा मुक्तीदाता
भीम जन्माला
गं बाई भीम जन्माला

14 फेब्रुवारी 1854 मध्ये भीमाईचा जन्म जहाला. त्यांचे वडील धर्मा पंडित
मुरबाड कर मिलीटरी मध्ये होते.
ते मराठा पलटणीत व नंतर 106 Sapers And Minari मध्ये सुभेदार होते.
मालोजी आंबावडेकर देखील इंग्रजांच्या सैन्यात शिपाई होते त्यांनीसुद्धा नॉर्मल शाळेत शिक्षण घेतले ते सदाचारी होते.
त्यांना तीन मुलं एक मुलगी त्यांनी रामानंद पंथाची दीक्षा घेतली.रामजी मीराबाई च्या पाठिवर 1848 मध्ये जन्मले
याच वर्षी महात्मा फुले यांनी पहिली शाळा काढली!!!
आणि याच वर्षी सूर्य पित्याचा जन्म जहाला !!....

मालोजीची दोन ही मुलं सैन्यात नोकरीला ते स्वतः सुशिक्षित , सुसंस्कृत असल्याने त्यांनी रामजीला सैनिक शाळेत घातले जातीने मालोजीने शिक्षणाकडे लक्ष दिले म्हणून ते नॉर्मल परिक्षा उत्तीर्ण झाले!!

18 व्या वर्षी रामजी इंग्रजी सैन्यात शिपाई म्हणून रुजू झाले तेथे चांगले योगदान दिले 19 व्या वर्षी त्यांचा विवाह तेवढ्यात तोलामोलाच्या सुभेदार धर्मा मुरबाडकर यांची मुलगी भीमाबाईशी झाला

रामजीच्या उत्तुंग कामगिरीमुळे त्यांना शिक्षक पदी बढती मिळाली हि घटना ऐतिहासिक ठरली त्यांना ट्रेनिंग साठी सैनिक शाळा पुणे येथे पाठविले तेथे त्यांना महात्मा फुले यांनी प्रशिक्षण दिले
होते असा उल्लेख हरी नरके यांच्या महात्मा फुले गौरव ग्रंथात आढळतो
त्यामुळे ते आदर्श शिक्षक ठरले हा दुर्मिळ योग जुळून आला ते 14 वर्षे मुख्याध्यापक होते.

संत चोखामेळाचं
अख्खं घर झालं संतांचं माहेर
वेशीच्या बाहेरी चोखा-सोयरा कर्म मेळा , निर्मळा-बंकानं लिहिले विद्रोही अभंग
मालोजी ,धर्माजीला इंग्रजी शिक्षणाचा छंद
भीम नातवाच्या किर्तीचा जगी कस्तुरी सुगंध
तो काळ वर्ण धर्म, सनातन परंपरेचा
स्पृश्य अस्पृश्य भेदभाव नित्याचाच
सावलीचा विटाळ, वेशीच्या बाहेरी किडा मुंगी सारखं जगणं आणि रोजचंच गावकिची कामं गुरूढोरं वढणं पाचवीला
पुजलेलं आणि अशा काळात इंग्रजांनी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या या शूर वीरांना सैन्यात भरती केले आणि त्यांच्या पिढ्यान् पिढ्यांचं सोनं केलं
या दोन घरांच्या दैदिप्यमान कामगिरीचा प्रकाश जगात पडला

अठरा विश्व दारिद्र्याचा सामना करत सुभेदार म्हणून निवृत्त झाल्यानंतर रामजीनं आपल्या मुलांना शिक्षण दिले 50 रूपये पेन्शन मध्ये घर , मुलांचं शिक्षण हि तारेवरची कसरत कशी केली असेल??

आपल्या मुलांना चांगले दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी रामजी आग्रही असत म्हणून ते सातारा येथून मुंबईला गेले नोकरी शोधण्याचा प्रयत्न केला.

### शिक्षण

शतकानुशतकांचा अंधार भेदण्या
रामजींच्या संस्कारांचा गिरवूनी धडा
भीमानं 18,18, तास
अभ्यासाचा उचलला विडा !!
म्हणूनी जगामधी
लाविला विद्येचा दिवा !!...

सपकाळ म्हणजेच आंबावडेकर घराण्यात शिक्षणाची आणि सुसंस्कारांची उदात्त परंपरा होती. त्याच आदर्श घराण्यात बाबासाहेबांचा जन्म झाला.वडिल मुख्याध्यापक , सुभेदार कर्तव्यदक्ष होते.

भीमरावांना वाचनाचे वेड लावण्याचं काम रामजींनी केले

सातारा येथे पूर्व प्राथमिक शिक्षण झाले त्याच वेळी भीमाईचे निधन झाल

रामजींनी दुसरे लग्न जिजाबाई या विधवेशी केले.

पुढच्या शिक्षणासाठी रामजींनी मुंबईची वाट धरली . रामजींनी आनंदराव चे शिक्षण बंद करून त्यांना नोकरीला लावले म्हणून भीमरावांचे शिक्षणाला गती मिळाली. स्वतः रामजी बाबासाहेबाना गणित व इंग्रजी हे विषय शिकवत त्यामुळे हे विषय उत्तम झाले .1907 मध्ये भीमराव मॅट्रिक शालांत परीक्षा पास झाले.भीमरावांचा विवाह प्रथेप्रमाणे बालपणी रमाईशी झाला.

तरीही शिक्षणात खंड पडला नाही

पुढील शिक्षणासाठी एलफिन्स्टन महाविद्यालयात दाखल झाले.बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांच्याकडून दरमहा 25रूपये शिष्यवृत्ती मिळत होती.पण रामजी अथक मेहनत करून शिक्षण आणि वाचन आणि कुटुंबाचा चरितार्थ चालवित होते.बाबासाहेब 1913 मध्ये पर्शियन आणि इंग्रजी विषय घेऊन बी.ए.झाले त्यानंतर सयाजीराव गायकवाड यांच्या मदतीमुळे उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात गेले तेथे अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र , इतिहास या विषयांचे अध्ययन केले. अर्थशास्त्र मुख्य विषय घेऊन प्राचीन भारतीय व्यापार प्रबंध लिहून M.A.ची पदव मिळवली.1916 मध्ये कोलंबिया विद्यापीठाने P.hd पदवी बहाल केली. त्यानंतर बाबासाहेबांनी पुढील शिक्षण लंडन या ठिकाणी घेतले आणि त्या ठिकाणी देखील त्यांनी M.sc,Dsc,Bar At Law या पदव्या मिळविण्यासाठी त्यांना रमाईला फार कष्ट सोसावे लागले.

या पदव्या मिळविण्यासाठी बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रचंड वाचन लेखन केले

ग्रंथालयात पहिला येणारा आणि शेवटी जाणारा विद्यार्थी म्हणून बाबासाहेबना ओळखले जात असे.तसेच कोलंबिया विद्यापीठाने 1952 मध्ये L.L.D. आणि उस्मानीया विद्यापीठाने 1953 मध्ये D.Lit अशा पदव्या दिल्या.तसेच जागतिक बौद्ध धम्म परिषदेने बोधीसत्व हा किताब दिला

## अनेक भाषांमध्ये पारंगत

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठी मातृभाषेसह इंग्रजी, हिंदी,पाली, संस्कृत, गुजराती, जर्मन, पर्शियन, फ्रेंच, कन्नड बंगाली इत्यादी अनेक भाषांवर प्रभुत्व होते.

उच्च पदव्या अमेरिकेत घेऊन ते भारतात आले. पुन्हा ते बडोदा संस्थानात नोकरीला गेले. उच्चशिक्षित असूनही अस्पृश्यतेचे चटके रोज बसत होते एक अधिकारी म्हणून काम करत असताना त्यांच्या हाताखालचे सवर्ण लोक वाईट वागणूक देत त्यांच्या हाताखालचे शिपाई लोक लांबूनच टेबलावर फाईली फेकत पिण्यासाठी त्यांना तेथे पाणी मिळत नव्हते या अपमानाने व्यतीत होऊन त्यांनी नोकरी सोडली आणि याच काळात होणाऱ्या अन्यायामुळे त्यांचे मन पेटून उठले आणि कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना इंग्लंडला जाण्यासाठी आर्थिक मदत केली आणि तेथे सुद्धा त्यांनी बॅरिस्टर पदवी मिळवली लंडन विद्यापीठाने त्यांना डीएससी पदवी प्रदान केली वाईट अनुभव आल्यामुळे पुन्हा नोकरी करायचे नाही असा निर्णय घेतला 1924 मध्ये त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला अस्पृश्यतेमुळे अनेक अनुभव त्यांना तेथेही आले अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी 20 जुलै 1924 रोजी बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन केली शिक्षण प्रसार करणे मोफत वाचनालय चालवणे, अस्पृश्यांना हक्काची जाणीव करून देणे आणि अस्पृश्यांच्या वेदनांना वाचा फोडण्यासाठी जनजागृती साठी वृत्तपत्रांच्या जगात प्रवेश केला मूकनायक1920, बहिष्कृत भारत1927ते1929, जनता1930 समता1956 ही वृत्तपत्रे सुरू केली आणि चालवून दाखवली

भीम बाळाच्या बालमनाला  
पोहचल्या किती अस्पृश्यतेच्या झळा??  
शाळेबाहेर बसून गिरवला स-समतेचा,न- न्यायाचा ,ह- हक्काचा धडा!!!..  
पाण्याच्या. घोटासाठी कितीदा गुदमरले श्वास !!  
अति उच्च शिक्षणाचा घेतला ध्यास !!  
स्वातंत्र्य,समता बंधुतेचा दिला नारा!!  
वंदन माझे घटनेच्या शिल्पकारा

## कौटुंबिक जीवन

बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर अभंगवाणी , कबीरवाणी यांचा प्रभाव होता.तसेच अनेक पुस्तके त्यांना गुरू सारखं मार्गदर्शन करत होती. म्हणून त्यांचं व्यक्तिमत्त्वाला पैलू पडत गेले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर हे विश्वाला पडलेलं कोडं आहे!!. आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर संपूर्ण विश्व आपल्या कवेत घेऊन प्रवाहाविरुद्ध जावून मानापमानाच्या

पचवून राशी ते अव्वल ठरले आणि माणूस म्हणून जगण्याचा अधिकार सर्वांना आहे हे दाखवून दिले

उच्चशिक्षित, नेता, वकिल, प्राध्यापक , प्राचार्य,अर्थशास्त्रज्ञ,जलतज्ञ, पत्रकार, संपादक , उत्तम संसदपटटू , उत्तम वक्ते, लेखक, तत्ववेत्ता,घटनाकार, मंत्री, साहित्यक,शिक्षणतज्ज्ञ, विश्वरत्न, समाजशास्त्रज्ञ, राष्ट्रप्रेमी, थोर समाजसुधारक अशा अनेक आघाड्यांवर प्रभुत्व मिळवत समाज प्रबोधन केले. आपल्या कुटुंबाची काळजी घेतली आणि कुटुंब प्रेमी म्हणून त्यांची ख्याती आहे डॉक्टर बाबासाहेबांना

एकूण पाच अपत्य झाली यशवंत सोडून रमेश, गंगाधर,इंदू, राजरत्न यांच्या मृत्यूचे आभाळाएवढं दुःख पचवून डॉक्टर बाबासाहेब आपल्या ध्येयासाठी मार्गक्रमण करत राहिले.9 व्या वर्षी रमाईचा विवाह झाला आणि 37 व्या वर्षी मृत्यू रमाईने आपल्या अपत्यांचे मृत्यूचे तांडव पचवून

बाबासाहेब यांना शिक्षणाचा मार्ग मोकळा करून दिला. रमाईने त्याग केला म्हणून बाबासाहेब हिमालयाची उंची गाठू शकले. डॉ बाबासाहेब 7 वर्षं शिक्षणासाठी परदेशात होते अगोदरच्या चार वर्षांत आनंदराव , लक्ष्मीबाई यांच्या बरोबर संसाराची जबाबदारी सांभाळली बाबासाहेबांना इकडची चिंता लागू दिली नाही.पण आनंदराव यांच्या मृत्यूनंतर कुटुंबाची जबाबदारी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर पडली कुटुंब प्रमुख म्हणून सर्वांची काळजी घेतली लक्ष्मीबाई, मुकुंद, रमाई, यशवंत यांची काळजी घेत असत त्यांनी नोकरी करून पैसे कमविले आणि लंडनला गेले . रमाईने कधी हट्ट केला नाही ती कधी रुसली नाही

बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक प्रवासात रामजी, आनंदराव, लक्ष्मीबाई, बाळाराम, मीरा आत्या आणि रमाई यांनी कौटुंबिक जबाबदारी पार पाडली तसेच छत्रपती शाहू महाराज, बडोदा संस्थानचे राजे सयाजी गायकवाड आणि सर्व शिक्षक प्राध्यापक यांनी सहकार्य केले म्हणून बाबासाहेब आपल्या आयुष्यात 32 पदव्या घेऊ शकले.

इतर छंद

डॉक्टर बाबासाहेबांना लहानपणापासून संगिताची आवड होती. कबीराचे दोहे पाठ होते.ते अप्रतिम तबलावादन करावयाचे , व्हायोलीनचे धडे मुंबई येथील नामवंत बळवंत साठे यांच्या घरी जाऊन घेतले

रात्री झोपण्यापूर्वी थकवा दूर करण्यासाठी व्हायोलीन वाजवून झोपायचे कृष्णराव फुलउमरीकर यांच्याकडून गायन शिकले त्यांचा आवाज सुंदर होता. उच्च कोटीचे संगीत आवडत असे त्यांनी शास्त्रीय संगीताचे धडे घेतले होते. संगित विषयी बोलताना म्हणत माझी दहा भाषणं एका जलसाच्या बरोबरीची आहेत ते आपल्या गुरुंना भरपूर फि देत असत जगात सर्वात जास्त गाणी त्यांच्यावर लिहिलेली आहेत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना

चित्रकलेची आवड होती वयाच्या 65. व्या वर्षी गौतम बुद्धांचे उघडे डोळे असलेले चित्र काढले आहे !!.

राजगृह बांधले

आपले आयुष्य चाळीत घालवलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रशस्त असे घर बांधून राजगृह असं नाव दिलं ते आपल्या सर्व कुटुंबीयांसह रहाण्यास गेले पुस्तकांसाठी घर बांधणारे डॉक्टर बाबासाहेब जगात असामान्य ठरतात पुत्र यशवंत, पुतण्या मुकुंद यांच्या शिक्षणाविषयी ते काळजी त्यांना अभ्यासाठी खुर्ची टेबल लॅम्प खरेदी केले मुलांना इस्त्रीचे कपडे असावेत याकडे लक्ष असे.यशवंतला सांधेदुखीचा आजार होता त्यांची काळजी घेत असत पण रमाईचा आजार बरा करण्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी खूप प्रयत्न केले त्यांची सेवा जवळ बसून केली.रमाईने अनेक रात्री बाबां साठी जागून काढल्या होत्या बाबासाहेब आंबेडकरांना रमाईचा त्याग आठवत होता शरिराची कष्टामुळे झीज झाली होती 1935. मध्ये रमाईचे निधन झाले आणि डॉ बाबासाहेब यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आपल्या कुटुंबाप्रमाणे डॉक्टर बाबासाहेब आपल्या समाजाची काळजी घेत असत.समाजाला स्वाभिमानी आणि प्रतिष्ठेचे जीवन जगण्याची शिकवण दिली

* सामाजिक सामाजिक कार्य

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी उच्च पदव्या अमेरिका, इंग्लंड येथे खूप परिश्रमाने मिळविल्या त्यांनी इंग्लंड अमेरिका येथे नोकरी मिळवून स्थिर जीवन जगू शकले असते. भारतात स्वाभिमानी नोकरी मिळवू शकले नाहीत सिडनेहॅम महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केले.लॉ कॉलेजचे प्राचार्य म्हणून काम केले. वकिली केली पण अस्पृश्यतेचा कलंक पुसण्यासाठी त्यांनी सामाजिक कार्याला सुरुवात केली 1923 मध्ये मुंबई विधिमंडळात पाणवठे , धर्मशाळा, विद्यालये आणि न्यायालय येथे अस्पृश्यांना मुक्त संचार देण्याचा ठराव झाला.बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन करण्यात आली शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हे संघटनेचे ब्रिद वाक्य ठरले.

3 एप्रिल 1927 पासून बहिष्कृत भारत पत्र सुरू केले ,समता पाक्षिक सुरु केले.कुलाबा परिषद भरविण्यात आली यातून समता सैनिक दल अस्तीत्वात आले. 20

मार्च 1927 रोजी सत्याग्रह करून समतेच्या दिशेने पाऊल टाकले. सामाजिक भेदभाव करणाऱ्या मनुस्मृती ग्रंथाचं दहन

अनेक मंदिरांमध्ये सत्याग्रह केले

गोलमेज परिषदेत अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली राखीव जागा मागितल्या

*शैक्षणिक संस्थांची निर्मिती

8 जुलै 1945 रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटी हि शैक्षणिक संस्था स्थापन केली आणि मुंबईत सिध्दार्थ महाविद्यालय सुरू केले औरंगाबादमध्ये मिलिंद महाविद्यालय सुरू केले आणि मराठवाड्यातील सर्वांना शिक्षण समूहाच्या प्रक्रियेत सहभागी होता आले.शाळेबाहेर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिक्षण संस्था स्थापन केल्या

हि व्यवस्थेला दिलेली चपराक म्हणावी लागेल

- हिंदू कोड बिल (महिला स्वातंत्र्याचा जाहीरनामा)

आपले कुटुंब काटकसरीने चालवून बाबासाहेबांनी हिमालया एवढं कार्य समाज आणि देशाच्या हितासाठी केले असा राष्ट्रभक्त पुन्हा होणे नाही !! आणि भारतीय महिलांना स्वातंत्र्य, स्वाभिमान हिंदू कोड बिल तयार करून दिला अनेक सवलती घटनेच्या माध्यमातून महिला आज घेताना दिसतात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे सोनियाचे दिवस महिलांना आले आहेत सर्व भारतीयांवर उपकार केले म्हणून महिला आनंदाने जगत

विपुल लेखन

डॉक्टर बाबासाहेबांनी

चिंतन, मनन करून

वास्तव परिस्थिती रेखाटली

प्रकाशित, अप्रकाशित ग्रंथ, भाषणं,लेख

आदींचा संग्रह मोठा

राज्यघटना म्हणजे लोकशाहीचा आत्मा

सामाजिक , राजकीय, आर्थिक,शैक्षणिक, धार्मिक भाषणं गाजवली

14 ऑकटो.1956 बौद्ध धम्म दिक्षा घेतली

6डिसेंबर 1956साली अचानक डॉक्टर बाबांची प्राणज्योत विझली…

**ग्रंथ सूची**

1 महामानव. डॉ.गायकवाड ज्ञानराज

2 भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास डॉ. जयसिंग पवार

3 20 शतकातील महाराष्ट्राचा इतिहास प्रा. डॉ.गणेश राऊत

4. 20. व्या शतकातील महाराष्ट्र डॉ.कविता गगराणी, डॉ. पी.एन. शिंदे